नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०० Issue - 100 | वार - गुरुवार दि. ३ सप्टेंबर २०२६ Blow- Thursday Date 3 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ५८ लाख कुणबी नोंदींचा डेटा सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द; १ हजार ५०९ पैकी १ हजार ३७३ गुन्हे मागे

## एकट्या मराठवाड्यात साडेतीन लाख प्रमाणपत्रे वितरित झाल्याची शासनाची माहिती; आता आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेवर पुढील दिशा अवलंबून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत आतापर्यंत केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीची सविस्तर आकडेवारी बुधवारी जाहीर केली. मराठवाड्यात सुमारे साडेतीन लाख प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून, ५८ लाख नोंदींचा डेटा डिजिटल स्वरूपात जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती सरकारच्या



शिष्टमंडळाने पत्रकार परिषदेत दिली. तसेच १० ते १७ सप्टेंबरदरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' राबवून पात्र नागरिकांच्या अर्जांची प्रक्रिया गतीने पूर्ण केली जाणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री उदय सामंत यांनी ही भूमिका मांडली.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळातील गायकवाड आयोग आणि त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणाचा उल्लेख करण्यात आला. इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला न्याय देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जुन्या महसूल नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या माध्यमातून आतापर्यंत मराठवाड्यात साडेतीन लाख दाखले देण्यात आले आहेत. तसेच ५८ लाख नोंदींचा डेटा पेनड्राइव्हद्वारे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. या प्रक्रियेत नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र 'मराठा कक्ष' स्थापन करण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यात 'नोडल अधिकारी' नेमण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटनुसारही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत ३ हजार ५०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

याशिवाय, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या मागणीवर बोलताना सरकारने स्पष्ट केले की, आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या १ हजार ५०९ गुन्ह्यांपैकी १ हजार ३७३ गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. उर्वरित १०८ प्रकरणांची चौकशी सुरू आहे. सरकारने आपले निर्णय आणि मसुदा सादर केला असून, आता आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेवर पुढील दिशा अवलंबून असणार आहे.

# दिशा सालियन मृत्यूचा तपास आता 'सीबीआयकडे'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवंगत अभिनेता सुशांतसिंग राजपूत याची मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यूचे गूढ आता केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) तपासातून उलगडणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने बुधवारी सीबीआयला या प्रकरणात गुन्हा नोंदवून नव्याने तपास करण्याचे निर्देश दिले. आतापर्यंत मुंबई पोलिसांनी दोन टप्प्यांत केलेला सुमारे सहा वर्षांचा तपास अपुरा आणि परिणामकारक नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या तपासातून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळण्याऐवजी उलट अधिक प्रश्न निर्माण झाल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे.



न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने दिशाचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिकेवर हा आदेश दिला. याचिकेत सालियन यांनी मुलीच्या मृत्यूचा तपास सीबीआयकडे सोपवावा आणि न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास करावा, अशी मागणी केली होती. मात्र न्यायालयाने तपास सीबीआयकडे सोपवताना न्यायालयाच्या देखरेखीची मागणी मान्य केलेली नाही. दिशाच्या मृत्यूनंतर मालवणी पोलिसांनी ९ जून २०२० रोजी अपघाती मृत्यूची नोंद केली होती. पोलिसांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७४ अंतर्गत तपास केला आणि २६ ऑक्टोबर २०२० रोजी अहवाल सादर केला. हा अहवाल ४ फेब्रुवारी २०२१ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी स्वीकारला आणि प्रकरण बंद झाले.

मात्र मृत्यूबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे महाराष्ट्र सरकारने ११ डिसेंबर २०२३ रोजी मुंबई पोलीस आयुक्तांना पुढील तपास करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर १२ डिसेंबर २०२३ रोजी पुन्हा तपास सुरू करण्यात आला. हा तपास एप्रिल २०२६ पर्यंत चालला आणि १४ एप्रिल २०२६ रोजी अहवाल सादर करण्यात आला. या तपासातही नव्याने कोणताही पुरावा मिळाला नसल्याचे नमूद करून पूर्वीच्या निष्कर्षांचीच पुनरावृत्ती करण्यात आली. ६ मे २०२६ रोजी हा अहवाल स्वीकारण्यात आला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, दोन्ही तपासांत मृत्यू आत्महत्येमुळे झाल्याचा निष्कर्ष निघाला होता आणि घातपाताचा पुरावा आढळला नव्हता. मात्र उच्च न्यायालयाने या तपासाच्या पद्धतीवरच प्रश्न उपस्थित केला.

### गुन्हा नोंदवून सर्व पैलूंचा तपास करण्याचे निर्देश

न्यायालयाने कलम १७४ अंतर्गत होणाऱ्या चौकशीची व्याप्ती स्पष्ट केली. या तरतुदीचा मुख्य उद्देश मृत्यू संशयास्पद किंवा अनैसर्गिक परिस्थितीत झाला आहे का आणि मृत्यूचे वरवरचे कारण काय आहे, हे निश्चित करणे हा आहे. मात्र एखादा दखलपात्र गुन्हा घडल्याचा संशय असल्यास त्यासाठी स्वतंत्रपणे एफआयआर नोंदवून नियमित गुन्हेगारी तपास करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात पोलिसांनी सुमारे सहा वर्षे दोन टप्प्यांत तपास केला; मात्र तो कलम १७४च्या चौकटीतच राहिला. न्यायालयाच्या मते, अशा प्रकारचा तपास दखलपात्र गुन्ह्याच्या नियमित तपासाशी समतुल्य मानता येणार नाही. न्यायालयाने तपासातील अनेक बाबी 'गंभीर विसंगती' म्हणून नमूद केल्या आहेत. या निरीक्षणांच्या आधारेच प्रकरणात एफआयआर नोंदवून सखोल तपासाची आवश्यकता असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र, या निरीक्षणांवरून कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दोष निश्चित केलेला नाही, हे न्यायालयाने आवर्जून स्पष्ट केले आहे.


# अयोध्या राम मंदिराला मिळाले पहिले सीईओ; निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांच्यावर मोठी जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अयोध्या येथील भव्य श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या व्यवस्थापनाबाबत एक अत्यंत मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. श्री राम मंदिर तीर्थ क्षेत्र ट्रस्टला त्यांचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) मिळाले आहेत. भारतीय हवाई दलाचे निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा (गळींशपवीर चळीहीर) यांची या सर्वोच्च पदासाठी निवड करण्यात आली आहे.

एअर मार्शल जितेंद्र मिश्रा हे आपल्या नियुक्तीच्या दिवसापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी राम मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) म्हणून जबाबदारी सांभाळतील. ते याच वर्षी एप्रिल महिन्यात भारतीय हवाई दलातून निवृत्त झाले होते.

एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी भारतीय हवाई दलात तब्बल ३८ वर्षे उल्लेखनिय सेवा बजावली आहे. लढाऊ विमान पायलट, कॉम्बॅट इन्स्ट्रक्टर आणि टेस्ट पायलट म्हणून त्यांनी



काम पाहिले आहे. त्यांनी १९९९ च्या ऐतिहासिक कारगिल युद्धात तसेच 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती.

उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्याचे रहिवासी असलेले जितेंद्र मिश्रा हे एनडीए (छऊ) खडकवासलाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांच्याकडे ३ हजार तासांपेक्षा जास्त वेळ लढाऊ विमाने उडवण्याचा दांडगा अनुभव आहे. त्यांच्या अतुलनीय सेवेबद्दल त्यांना 'सर्वोत्तम युद्ध सेवा मेडल'ने सन्मानित करण्यात आले आहे.

राम मंदिराच्या सीईओ पदासाठी तब्बल ५५०० हून अधिक उमेदवारांचे अर्ज आले होते. त्यापैकी केवळ १८ जणांची नावे शॉर्टलिस्ट करण्यात आली होती. शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांच्या खानपान, जीवनशैली आणि हिंदू धर्माशी संबंधित विविध धार्मिक मान्यतेबाबत सखोल प्रश्न विचारून चाचणी घेण्यात आली होती.

या निवडीसाठी ट्रस्टने निवृत्त न्यायमूर्ती प्रमोद कोहली, विष्णुकांत चतुर्वेदी आणि सुरेश हावडे यांची ३ सदस्यांची विशेष समिती स्थापन केली होती.

राम मंदिराच्या सीईओ पदावरील व्यक्तीवर मंदिराचे संपूर्ण प्रशासकीय, आर्थिक आणि कायदेशीर व्यवस्थापन सांभाळण्याची मुख्य जबाबदारी असेल. मंदिराची सुरक्षा, भाविकांची सोय, मंदिराचा दैनंदिन कारभार आणि आर्थिक पारदर्शकता राखण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. जून-जुलै महिन्यात राम मंदिरात दानाची चोरी झाल्याचे प्रकरण समोर आले होते. याप्रकरणी पोलिसांनी ८ जणांना अटक केली होती, ज्यानंतर अनिल मिश्रा आणि चंपत राय यांना ट्रस्टचा निरोप घ्यावा लागला होता. या घटनेनंतर ट्रस्टच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी सर्वात आधी सीईओ पदाची गरज व्यक्त केली होती.

# शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी 'चला शाळेत जाऊया' अभियान; शिक्षणमंत्र्यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शाळांमधील मूलभूत सुविधा, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या वतीने राज्यभरात 'चला शाळेत जाऊया' हे विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी बुधवारी केली. मुंबईतील बालभवन येथे आयोजित शिक्षण विभागाच्या 'शिक्षण संवाद' या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. बैठका आणि कागदी नियोजनाचे प्रतिबिंब प्रत्यक्ष शाळांमध्ये आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीत दिसले पाहिजे, असे स्पष्ट करत त्यांनी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन काम करण्याचे निर्देश दिले. या कार्यशाळेस शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांच्यासह विभागातील सर्व संचालक, उपसंचालक आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील आठही विभागांत वरिष्ठ अधिकाऱ्यांची जिल्हानिहाय जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, हे अधिकारी चार दिवसांच्या विशेष दौऱ्यात शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन तिथल्या परिस्थितीचे मूल्यांकन करतील. शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छ स्वच्छतागृहे आणि सुरक्षित परिसर या मूलभूत सुविधांना प्राधान्य दिले जावे, तसेच बालवाटिका ते तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन आणि गणिताचे मूलभूत कौशल्य भक्कम करण्यावर भर द्यावा, असे निर्देश मंत्री भुसे यांनी दिले.

## २० विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर; आंध्र प्रदेशातील पोलावरम जिल्ह्यातील गोल्लागुप्पा येथील घटना

# मलेरिया प्रतिबंधात्मक औषध घेतल्याने ५३ विद्यार्थी रुग्णालयात, ७ वर्षीय बालिकेचा मृत्यू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भद्राचलम : आंध्र प्रदेशातील पोलावरम जिल्ह्यातील गोल्लागुप्पा गावात मलेरियावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्लोरोक्विनच्या गोळ्या दिल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिणाम जाणवून त्यांची प्रकृती बिघडल्याची घटना घडली. या घटनेत एका ७ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला असून ५३ जण आजारी पडले आहेत. त्यापैकी २० विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.

गोल्लागुप्पा येथे एका विद्यार्थिनीचा मलेरियामुळे मृत्यू झाल्यानंतर स्थानिक आरोग्य विभागाने आरोग्य शिबिर आयोजित केले होते. यावेळी सरकारी शाळा आणि अंगणवाडी केंद्रातील विद्यार्थ्यांना क्लोरोक्विनच्या गोळ्या देण्यात आल्या. औषध घेतल्यानंतर काही विद्यार्थ्यांना उलट्या, अस्वस्थता आणि इतर त्रास सुरू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुसरीच्या इयत्तेत शिकणारी ७ वर्षीय मादिवी जमुना हिची प्रकृती बिघडल्यानंतर तिला लक्ष्मीपुरम प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी भद्राचलम येथे हलविण्यात आला आहे.

आजारी विद्यार्थ्यांना भद्राचलम येथील शासकीय क्षेत्रीय रुग्णालयात तसेच स्थानिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजशेखर रेड्डी यांच्यासह वैद्यकीय पथके विद्यार्थ्यांवर उपचार करत आहेत. काही विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असली तरी सध्या उपचार घेत असलेल्या रुग्णांची स्थिती स्थिर आहे. घटनेची माहिती मिळताच चिंतूर आयटीडीएचे प्रकल्प अधिकारी शुभम नोखवाल आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. हेमंत कुमार यांनी रुग्णालयात धाव घेतली. काकीनाडा शासकीय सर्वसाधारण रुग्णालयातील ९ सदस्यीय तज्ज्ञ पथक गावात दाखल झाले असून बालरोगतज्ज्ञांसह विशेष वैद्यकीय पथके परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

क्लोरोक्विनच्या सेवनानंतर विद्यार्थ्यांना नेमका कोणता प्रतिकूल परिणाम झाला आणि विद्यार्थिनीच्या मृत्यूचे कारण काय, याचा तपास सुरू आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी घटनेची चौकशी करण्याचे आदेश देत बाधित विद्यार्थ्यांना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दरम्यान जिल्हाधिकारी दिनेश कुमार यांनी नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन केले असून बाधित रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले.

## संपादकीय....

## निष्काळजीपणाचा फटका

आंध्र प्रदेशातील पोलावरम जिल्ह्यातील गोल्लागुप्पा गावात मलेरियावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्लोरोक्विनच्या गोळ्या दिल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिणाम जाणवून त्यांची प्रकृती बिघडल्याची घटना घडली. या घटनेत एका ७ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला असून ५३ जण आजारी पडले आहेत. त्यापैकी २० विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. गोल्लागुप्पा येथे एका विद्यार्थिनीचा मलेरियामुळे मृत्यू झाल्यानंतर स्थानिक आरोग्य विभागाने आरोग्य शिबिर आयोजित केले होते. यावेळी सरकारी शाळा आणि अंगणवाडी केंद्रातील विद्यार्थ्यांना क्लोरोक्विनच्या गोळ्या देण्यात आल्या. औषध घेतल्यानंतर काही विद्यार्थ्यांना उलट्या, अस्वस्थता आणि इतर त्रास सुरू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुसरीच्या इयत्तेत शिकणारी ७ वर्षीय मादिवी जमुना हिची प्रकृती बिघडल्यानंतर तिला लक्ष्मीपुरम प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी भद्राचलम येथे हलविण्यात आला आहे. आजारी विद्यार्थ्यांना भद्राचलम येथील शासकीय क्षेत्रीय रुग्णालयात तसेच स्थानिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजशेखर रेड्डी यांच्यासह वैद्यकीय पथके विद्यार्थ्यांवर उपचार करत आहेत. काही विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असली तरी सध्या उपचार घेत असलेल्या रुग्णांची स्थिती स्थिर आहे. घटनेची माहिती मिळताच चिंतूर आयटीडीएचे प्रकल्प अधिकारी शुभम नोखवाल आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. हेमंत कुमार यांनी रुग्णालयात धाव घेतली. काकीनाडा शासकीय सर्वसाधारण रुग्णालयातील ९ सदस्यीय तज्ज्ञ पथक गावात दाखल झाले असून बालरोगतज्ज्ञांसह विशेष वैद्यकीय पथके परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. क्लोरोक्विनच्या सेवनानंतर विद्यार्थ्यांना नेमका कोणता प्रतिकूल परिणाम झाला आणि विद्यार्थिनीच्या मृत्यूचे कारण काय, याचा तपास सुरू आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी घटनेची चौकशी करण्याचे आदेश देत बाधित विद्यार्थ्यांना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दरम्यान जिल्हाधिकारी दिनेश कुमार यांनी नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन केले असून बाधित रुग्णांची प्रकृती स्थिर आहे.

# शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कापूस क्रांती अभियानाची समन्वयाने अंमलबजावणी करावी : कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कापूस हे राज्यातील महत्त्वाचे नगदी पीक असून, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित वाण, योग्य पीक व्यवस्थापन तसेच शास्त्रीय पद्धतींचा प्रभावी वापर आवश्यक आहे. या अनुषंगाने केंद्र पुरस्कृत अभियानाची अंमलबजावणी करताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश कृषी, वित्त व नियोजन, मदत व पुनर्वसन आणि विधि व न्याय, कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिले.



कापूस कांती या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), उपसचिव प्रतिभा पाटील, कृषी सह संचालक उदय देशमुख यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, उत्पादकता व उत्पादन वाढवणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. यास्तव कापूस उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत आवश्यक मार्गदर्शन व तंत्रज्ञान पोहोचविणे, उत्पादन क्षमतेत वाढ करणे आणि कापूस उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात.

राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या निविष्ठा २०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार कराव्यात. यामध्ये कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यकारी समिती गठित करण्यात आली आहे. कृषी विद्यापीठाच्या सहाय्याने कार्यशाळा घेण्यात आल्या असून २०२६- २०२७ च्या आराखड्यास मान्यता देण्यात आली असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. तसेच या योजनेच्या माध्यमातून २०३०-२०३१ पर्यंत १२५ लाख गाठी कापसाचे उत्पादन व ५५० किलो लिंट/हेक्टरी उत्पादकता साध्य करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# दुधनीत झालेल्या पोलिसांच्या वरवरच्या कारवाईमुळे गुन्हेगार मोकाट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/निंगप्पा निंबाळ : दुधनी शहर आणि परिसरात फोफावलेल्या विविध अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी रिपाइं (आठवले) च्या वतीने सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केलेल्या मागणी अनुसार अखेर दक्षीण पोलीस स्टेशनचे पोलिस निरिक्षक विनोद घुगे व पोलिस उप अधीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनपर पथकांने कारवाईचे मोहीम हाती घेतली आहे. मात्र, ही कारवाई केवळ किरकोळ आणि छोट्या दारु विक्रेत्यांपुरतीच मर्यादित राहिल्याने उर्वरीत मटका, क्लब व चोरावर कधी कारवाई होणार? असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष मा. सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली जात आहे.

दुधनी शहरातील वाढती गुन्हेगारी, चोऱ्या, दंडेलशाही आणि अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची जाहीर मागणी केली होती. अवैध धंद्यांमुळे गरीबांचे संसार उघड्यावर येऊन सामाजिक शांतता धोक्यात आली असून चोरांच्या बंदोबस्तासाठी रात्रीची गस्त वाढवावी,व बाजारात मोबाईल चोरी व ईतर गुन्हे दाखल झाल्यावर लवकर कारवाई होत नसून यात रुध्देवाडी येथील अंबण्णा हिरोळी यांच्या मोबाईल चार वर्षापूर्वी चोरीस जाऊन फोन पे द्वारे लाखो रुपये लुट करणाऱ्यांच्या धागे दोरे सापडूनही कारवाई होत नाही,अलिकडेच सिन्नूर येथील बाळप्पा कांबळे यांच्या मोबाईल हरवले,मिस्सींग व मारामारीचे गुन्हा झाले तरी कारवाई होत नसल्याचे आरोप सैदप्पा झळकी यांनी केली आहे.हप्ते वेळेवर वसूल करता कारवाई का करत नाही? कशाही सवाल नागरीक आतून होत आहे.त्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी धाडसत्र सुरू केले आहे.

> **दुधनीतील अवैध धंद्यांपैकी फक्त दारुविक्रीवर कारवाई केली; क्लब, मटका आणी चोरावर ही कडक कारवाई झाली पाहिजे - सैदप्पा झळकी**

परंतु जनमानसातील प्रश्न कायम आहे -

पोलिसांच्या कारवाईत केवळ स्थानिक किरकोळ विक्रेते अडकत असून, या धंद्यांचे मूळ जाळे चालवणारे, होलसेल माल पुरवणारे मोठे माफिया मात्र अद्यापही कारवाईच्या कक्षेबाहेर आहेत.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या:

१) मुख्य सूत्रधारांवर कारवाई: केवळ किरकोळ विक्रेत्यांवर नव्हे तर रॅकेट चालवणाऱ्या बड्या मास्टर माईंड वर कठोर कारवाई व्हावी.

२) रात्रीची गस्त वाढवावी: दुधनी व परिसरात रात्रीच्या वेळी चोऱ्या आणि दहशत वाढली असून, नियमित आणि कायमस्वरूपी नाकाबंदी व गस्त असावी.

३) पारदर्शक कारवाई: कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता पोलीस प्रशासनाने निष्पक्ष कारवाई करावी, जेणेकरून सामान्य नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास बळकट होईल.

केवळ वरवरची कारवाई न करता पोलीस प्रशासन या अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करणार का? याकडे आता संपूर्ण दुधनीकरांचे लक्ष लागले आहे.

# एक राखी विरो के नाम, शासकीय निवासी शाळेचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील छत्रपती शिवाजी महाराज पब्लिक स्कूल अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा या शाळेतील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी 'एक राखी विरो के नाम' असा उपक्रम हाती घेतला. सदर विद्यार्थ्यांनी चक्क जम्मू काश्मीरलाच जवानांना रक्षाबंधन पोस्टाने पाठविल्या.

सदर शाळेतील अद्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांनी रक्षाबंधन उत्सवाच्या निमित्ताने एक राखी विरो के नाम ही संकल्पना सुचवली. विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन तयार केली. तर काही विकत घेतली. अशा राखी एकत्र करून सिमेवरील जवानांना एक स्व हस्ताक्षरात पत्र लेखन केले आहे. राखी सह पत्र व्यवहार करण्यात आले.

या शाळेत नवनवीन उपक्रम राबवून सामाजिक संदेश देण्यात येत असते. यापूर्वी अनेक उपक्रम राबवून जिल्ह्यात उपक्रमशील शाळा असी ओळख प्राप्त करून घेतली. पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

> **जम्मूकाश्मीरच्या जवानांना पाठविल्या राख्या : पत्र व्यवहाराची जपली परंपरा**

भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे.

या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जगात सदर शाळेतील विद्यार्थी यांनी जागतिक पत्र दिनाच्या औचित्याने पत्र व्यवहार ही परंपरा जपली. तेही हस्तलिखित केले. लिहिलेले एक ऐतिहासिक दस्तावेज तयार होते. या संदर्भात माहिती सांगण्यात आली.



या उपक्रमात सहभागी नैतिक बागडे, मानव कांबळे, नैतिक मसे पियुष मोहमारे तन्मय बागडे स्मित जनबंधू क्रिश जनबंधू नैतिक गेडाम यश नंदेश्वर संबोधी बंसोड प्रणय कोल्हे विनय कोल्हे नयन मेश्राम संघदीप वंजारी श्रेयश मेश्राम लखन पेंदाम सुजित मेश्राम दिलशान खंडारे रुद्र वालदे आवेश बंसोड असित दुधे रेयांश वालदे प्रणय शहारे हर्ष आंदे ज्ञानेश दडमल वंश खांडेकर श्रेयश नंदेश्वर अमन बडोले राजविर वासनिक कुणाल बडोले इशांत टेंभूर्णे प्रज्ञेश कांबळे प्रथमेश राऊत आदर्श टेंभूरकर शौर्य बोरकर लुमेंद्र वाघाडे जीत डहाट आयुष साखरे मोहित नागपुरे हे होते.

# महाराष्ट्र शासनाचे सुकाणू समिती सदस्य डॉ. अनिल राव यांची स्वेरीला सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला जळगाव येथील बहुशाखीय महाविद्यालय असलेल्या मूळजी जेठा कॉलेजचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.अनिल राव यांनी सदिच्छा भेट दिली. ते महाराष्ट्र शासनाच्या सुकाणू समितीचे सदस्य असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२०, तसेच वाणिज्य, संगणक व्यवस्थापन या विषयात त्यांनी पदव्युत्तर पदवी मिळवली आहे. डॉ.अनिल राव हे एक व्यावसायिक चार्टर्ड अकाउंटंट आहेत. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी सर्वप्रथम त्यांचे स्वागत केले. डॉ. राव यांनी स्वेरी अंतर्गत असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (डिप्लोमा व डिग्री) कॉलेज ऑफ फार्मसी (डिप्लोमा व डिग्री), स्वेरी लॉ





कॉलेज,आदी पाचही कॉलेज संबंधी माहिती जाणून घेतली तसेच स्वेरीतील संशोधनाबाबत सविस्तर माहिती देखील जाणून घेतली. संशोधनाकरिता मिळालेला निधी व त्यातील प्रगती पाहून डॉ. राव हे भारावून गेले. त्यांना उच्च शिक्षण क्षेत्रात ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात जळगाव येथील एम. जे. कॉलेजमध्ये केली. या शिक्षण संस्थेत वाणिज्य आणि करआकारणीचे व्याख्याता म्हणून त्यांनी काम केले तसेच त्यांनी ऑडिट, कर आकारणी, अंतर्गत प्रणाली आणि वित्त या विषयात विशेष प्राविण्यासह एक व्यावसायिक चार्टर्ड अकाउंटंट म्हणून देखील काम केले आहे. उच्चशिक्षणाच्या क्षेत्राला स्वतःला समर्पित करण्याच्या उद्देशाने, त्यांनी 'चार्टर्ड अकाउंटंट' म्हणून असलेला आपला 'प्रॅक्टिसचा दाखला' (सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस) आणि प्रस्थापित व्यावसायिक कारकीर्द सोडून दिली तसेच १९९६ मध्ये वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी ते एम. जे. कॉलेजचे प्राचार्य बनले. प्राचार्य पदावर १८ वर्षे काम केल्यानंतर, २०१४ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादरीकरण व सहभाग नोंदवण्यासाठी तसेच नामांकित विद्यापीठे व संस्थांशी यशस्वी सहयोगात्मक संशोधन संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी अनेक देशांचा प्रवास केला आहे. यामध्ये अमेरिका, युनायटेड किंगडम (युके), इटली, इस्रायल, थायलंड, चीन, एस्टोनिया, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क, कॅनडा, फ्रान्स आणि फिनलंड या देशांचा समावेश आहे. याचा परिणाम म्हणून, पेनसिल्व्हेनिया स्टेट युनिव्हर्सिटी (अमेरिका), मिलान इटलीतील पार्मा युनिव्हर्सिटी, नॅशनल सायन्स फाउंडेशन (अमेरिका) इत्यादींच्या सहकार्याने अनेक संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले. तसेच, देशभरातील विविध महाविद्यालयांच्या 'नॅक' मूल्यांकनासाठी त्यांनी अनेकदा 'पिअर टीम'चे (मूल्यांकन समितीचे) सदस्य म्हणूनही काम केले आहे. त्यांच्या नावावर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रकाशने जमा आहेत. त्यांनी लेखांकन

> **डॉ. राव यांनी स्वेरीबाबत जाणून घेऊन स्वेरीच्या 'पंढरपूर पॅटर्न इन प्रोफेशनल एज्युकेशन' तथा ट्रिपल पी इ', स्वायत्त अभ्यासक्रम, अटल कम्युनिटी इनोवेशन सेंटर, परम शवक सुपर कंप्यूटिंग सुविधा, कॅढेन्स सॉफ्टवेअर, आयडिया लॅब आदि बाबींचे विशेष कौतुक केले.**

(अकाउंटन्सी), ई-कॉमर्स, संगणक आणि महाराष्ट्रातील उच्चशिक्षण या विषयांवरील पुस्तकांचे सह-लेखन देखील केले आहे. ते 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या 'बोर्ड ऑफ स्टडीज'चे (अभ्यास मंडळ) अध्यक्ष आणि नामांकित सदस्य म्हणून कार्यरत होते. 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६' च्या मसुदा निर्मिती प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग होता.

बाटु ,यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, सीओईपीटी यु आणि केकेएसयु या विद्यापीठांच्या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या विशेष समितीचे ते अध्यक्ष आहेत. त्यांनी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या विविध विशेष समित्यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. यामध्ये सार्वजनिक विद्यापीठांच्या 'परिक्षा योजना' (पर्स्पेक्टिव्ह प्लॅन्स) बाबत मार्गदर्शक निकष विकसित करण्यासाठी नेमलेली डॉ. नरेंद्र जाधव समिती तसेच याच योजनांच्या निर्मितीसाठीची डॉ. के. बी. पाटील समिती आणि राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांसाठी 'सामायिक नियमावली' (कॉमन स्टॅटयूट्स ) तयार करण्यासाठीची डॉ. आर. एस. माळी समिती यांचा समावेश आहे. सध्या ते 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' (एनईपी) अंमलबजावणी कार्यदलाचे (टास्क फोर्स ) समन्वयक सदस्य आणि 'वित्त व लेखा संहिता' (फायनान्स अँड अकाउंट कोड) मसुदा समितीचे अध्यक्ष आहेत. ते 'जळगाव जनता सहकारी बँक' या प्रतिष्ठित अनुसूचित शहरी सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. या बँकेच्या महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांमध्ये ४३ शाखा असून बँकेची एकूण उलाढाल ४ हजार कोटी रुपये इतकी आहेत. ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या 'कॉलेज ऑफ सुपरवायझर्स' मध्ये अतिथी प्राध्यापक आहेत. ते 'विद्यापीठ विकास प्रबोधिनी' या राज्यस्तरीय संस्थेचे संयोजक आहेत.

भारतीय शास्त्रीय संगीताची विशेष आवड असलेल्या डॉ. राव यांनी महाविद्यालयीन काळात फुटबॉल, हॉकी आणि खो-खो या खेळांमध्ये सलग पाच वर्षे आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. यावेळी स्वेरीचे कॅम्पस इनचार्ज डॉ. एम. एम. पवार, डिग्री कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्यासह अभिजीत पाटील, अधिष्ठाता, विभागप्रमुख शिक्षकेतर कर्मचारी शिक्षक आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२



# थकीत बिल द्या; पहिली उचल जाहीर करा; अन्यथा संघर्ष अटळ!

## ऊस दर संघर्ष समितीची माढा येथे आक्रमक बैठक, थकीत ऊस बिलासाठी तहसीलदारांना निवेदन; पहिली उचल जाहीर केल्याशिवाय कारखान्यांची धुराडी पेटू देणार नाही!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या थकीत ऊस बिलांसह आगामी गाळप हंगामातील ऊसदराच्या प्रश्नावर ऊस दर संघर्ष समितीची माढा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

मागील गाळप हंगामातील थकीत ऊस बिले तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावीत, या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांचा ऊस घेऊन त्याचे पैसे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कारखानदारांना आता जाब विचारला जाणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

तसेच आगामी गाळप हंगामात पहिली उचल किती देणार हे स्पष्टपणे जाहीर केल्याशिवाय कोणत्याही साखर कारखान्याने धुराडे पेटवू नयेत, अशी ठाम भूमिका बैठकीत घेण्यात आली. शेतकऱ्यांना दराबाबत अंधारात ठेवून गाळप सुरू करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला संघटितपणे विरोध करण्याचा निर्धार करण्यात आला.

याशिवाय गावभेट दौरे आयोजित करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. गावागावात जाऊन थकीत ऊस बिले, आगामी ऊसदर, पहिली उचल आणि शेतकऱ्यांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्याला या लढ्यात सहभागी करून घेण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.





थकीत ऊस बिल मिळालेच पाहिजे, पहिली उचल जाहीर झालीच पाहिजे आणि शेतकऱ्याला त्याच्या उसाला योग्य व उच्चांकी दर मिळालाच पाहिजे. अन्यथा कारखानदारांविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष केला जाईल, असा इशारा ऊस दर संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला.

बैठकीस स्वाभिमानी शेतकरी संघटना, रयत, शिवसेना, रासप यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी दीपक भोसले, सचिन पाटील, निवास नागणे, अमोल वेदपाठक,चंद्रकांत बागल, शिवाजीभाऊ पाटील, बापू गायकवाड मेजर, सुहास पाटील, अभिजीत साठे, अजित परबत, सत्यवान गायकवाड, देविदास खरात, मालोजी आडकर, मुस्तफा काझी, बालाजी चव्हाण, अतुल माने-पाटील, गोरख वाकडे, सचिन खैरे, बळीराम गायकवाड, वैभव साळुंखे, भागवत मुकणे, विलास उबाळे, नवनाथ उबाळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

_माढा बैठक ऊस दर आंदोलन सोलापूर

# पंढरपूर शहरातून अवजड वाहतूक बंद करा; प्रशासनाचे दुर्लक्ष



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरातून होणारी अवजड वाहतूक बंद करा अशी अनेक वर्षांपासून शहा बाहेरून वळावी अशी मागणी अनेक वर्षापासून होत होती प्रशासन व वाहतूक पोलिसांकडून दुर्लक्ष होत होते असा आरोप नागरिकांतून केला जात आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या कार्यालय परिसरात रेल्वे उड्डाणपुलाजवळ सोळा चाकी ट्रक पलटी झाल्याने या प्रश्नाचे गांभीर्य पुन्हा एकदा समोर आली आहे.

या अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही ट्रक रस्त्यावरच पलटी झाल्याने काही काळ वाहतुकीस अडथळा झाला होता. विशेष म्हणजे महत्त्वाच्या रस्त्यावरच आणि पोलीस कार्यालयाच्या समोर प्रकार घडल्याने शहरातील नागरिकांमध्ये संताप होत आहे. पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून दररोज ५० ते ६० हजार भाविक पंढरपुरामध्ये विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येत असतात. पंढरपूर शहरातील अतिक्रमणे अधिक पंढरपुरातील वाहतुकीची कोंडी होत असताना त्यात पंढरपूर शहरामधून अवजड वाहतूक बंद करावी अशी मागणी अनेक वर्षापासून होत होती. त्यामुळे नागरिकांना व भाविकांना वाहतूक कोंडीचा मोठ्या समस्या करावे लागत आहे. पंढरपूर शहरातील अवजड वाहतूक पंढरपूर शहरा बाहेरून करावी अशी नागरिकांतून मागणी होत आहे. या प्रश्नावर पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनीही आवाज उठवल्याची सांगितले जात आहे. त्यांनी सांगून सुद्धा त्याची अंमलबजावणी होत नसल्याने प्रशासनाकडे याकडे दुर्लक्ष केली जात आहे. एखाद्या अपघातात जीवित हानी झाल्यानंतर प्रशासनाचे डोळे उघडणार का? असा संतप्त संवाद नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील वाढती वाहतूक अरुंद रस्ते अतिक्रमणे अवजड वाहनाची वर्दळ, लक्षात घेता प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन अवजड वाहतूक शहरा बाहेरून वळवावी अशी पंढरपूर शेरवाशांची मागणी जोर धरत आहे.

# विशाल लिहिणार यांची 'डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी साखरखेर्डा येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात सिंदखेडराजा तालुक्यातील अंचली येथे वास्तव्यास असलेले सिंदखेडराजा पंचायत समिती मध्ये कार्यरत असलेले डेटा एंट्री ऑपरेटर विशाल रमेश लिहिणार यांची 'डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कार २०२६' यासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्कार निवड समितीने प्रस्तावाची छाननी व चर्चेनंतर त्यांच्या कार्याची दखल घेत ही निवड केल्याचे निवडपत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवंगत वृक्षमित्र मधुकरराव खंडारे यांच्या तिसऱ्या स्मृतिप्रीत्यर्थ साखरखेर्डा, ता.

सिंदखेड राजा, जि. बुलढाणा येथे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या सन्मानासाठी राज्यस्तरीय पुरस्कार



सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांतील व्यक्तींकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार विशाल लिहिणार यांचा प्रस्ताव निवड समितीकडे प्राप्त झाला. समितीने प्रस्तावाची छाननी करून त्यांच्या कार्याचा विचार केल्यानंतर त्यांची उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कारासाठी निवड केल्याचे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

घरकुल विभागातील डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेल्या विशाल लिहिणार यांच्या कार्याची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे. पुरस्कारामुळे काम करण्यासाठी नवी प्रेरणा व ऊर्जा मिळेल, तसेच त्यांचे कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास निवडपत्रातून व्यक्त करण्यात आला आहे.

'डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कार २०२६' हा पुरस्कार त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल म्हणून प्रदान करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल विविध स्तरांतून विशाल लिहिणार यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या पुरस्कार सोहळ्याच्या आयोजनात पत्रकार सचिन खंडारे, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष तथा मुख्य आयोजक, तसेच पुरस्कार निवड समिती अध्यक्ष व साहित्यिक लेखक विकास सुखधाने आणि पत्रकार तथा निवड समिती उपाध्यक्ष समाधान सरकटे यांचा सहभाग आहे.

दरम्यान, राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाल्याने विशाल लिहिणार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. १०,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षा तयारी करिता पात्र असलेल्या उमेदवारांना एकरक्कमी रक्कम रु. १०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in NOTICEBORD Maharashtra Public Service Commission State Services interview 2025 येथे भेट द्यावी.

## चिराडपाड्याच्या चिमुकलीचा सह्याद्रीच्या कुशीत धाडसी पराक्रम; दुर्गप्रेमींकडून कौतुकाचा वर्षाव

# अवघ्या साडेतीन वर्षांच्या उत्कर्षाने ४ तासांत सर केला २८१५ फूट उंचीचा माहुली गड!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील चिराडपाडा गावातील अवघ्या साडेतीन वर्षांच्या कु. उत्कर्षा दत्तात्रय कारवे या चिमुकलीने आपल्या आई-वडिलांसोबत ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील प्रसिद्ध माहुली गडाची २८१५ फूट उंचीची चढाई तब्बल चार तासांत पूर्ण केली. पावसाळ्यानंतरचा निसरडा मार्ग, उभे चढ-उतार आणि आव्हानात्मक वाट पार करत उत्कर्षाने कोणताही थकवा न दाखवता उत्साहाने हा ट्रेक पूर्ण केला.

**आम्हाला आमच्या लेकीचा प्रचंड अभिमान वाटतो. सुरुवातीला एवढा मोठा किल्ला ती चढू शकेल का, अशी धास्ती होती. मात्र तिचा उत्साह आणि ऊर्जा पाहून आमचाही आत्मविश्वास वाढला. तिने संपूर्ण ट्रेक अतिशय उत्साहाने पूर्ण केला. हा क्षण आमच्यासाठी आनंददायी, प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे.**

**आई – दर्शना कारवे,**
**वडील– दत्तात्रय कारवे,**

माहुली गड हा सह्याद्रीतील प्रसिद्ध आणि चढाईच्या दृष्टीने आव्हानात्मक किल्ल्यांपैकी एक मानला जातो. अशा कठीण वाटेवर अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीने आपल्या आई-वडिलांसोबत आत्मविश्वासाने केलेली ही चढाई विशेष कौतुकास्पद ठरली आहे.

उत्कर्षाला सह्याद्रीतील प्रसिद्ध ट्रेकर आणि विश्वविक्रमवीर शिवकन्या कु. शर्विका म्हात्रे हिच्या साहसी कामगिरीची प्रेरणा मिळाली. तिचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत उत्कर्षानेही सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये आपली पहिली मोठी झेप घेतली.

ट्रेकदरम्यान अनेक ठिकाणी निसरडा रस्ता, खडतर चढाई आणि उभे उतार अशी आव्हाने होती. मात्र, उत्कर्षाने न डगमगता प्रत्येक टप्पा उत्साहाने पार केला. कुटुंबीयांच्या प्रोत्साहनामुळे तिचा आत्मविश्वास अधिक वाढला आणि अखेर चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर तिने माहुली गडाचा माथा गाठला.

उत्कर्षाच्या या धाडसी कामगिरीची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, दुर्गप्रेमी आणि निसर्गप्रेमींकडून तिचे कौतुक होत आहे. एवढ्या लहान वयात सह्याद्रीच्या



कडेकपारीत केलेली ही चिमुकलीची धाडसी वाटचाल अनेक बालकांसाठी आणि पालकांसाठी प्रेरणादायी ठरणारी



आहे. तर उत्कर्षा आणि तिची आई

आईवडिलांनी पुढील दोन वर्षात महाराष्ट्रातील १०० गडकिल्ले सर करण्याचा दृढ निश्चय केला आहे.

# अचलेरमध्ये झालेल्या दगडफेकीच्या व जाळपोळीच्या घटनेनंतर ११ आरोपींवर गुन्हे दाखल

## गावात शस्त्रे घेऊन तरुणांनी केली दहशत निर्माण

**लोहारा तालुक्यातील अचलेर येथे जुन्या भांडणाची कुरापत काढून दगडफेक व वाहनाची जाळपोळ केल्याची घटना शनिवारी घडली आहे दगडफेक करत व हातात तलवारी व काठ्या आणि मोठ मोठे दगड घेऊन वावरणाऱ्या आरोपींचा व्हिडिओ सध्या मोठ्या प्रमाणात देखील सोशल मीडियावर वायरल झाला आहे यामुळे नागरिकांमध्ये दगडफेक करणाऱ्यांची मोठी दहशत आणि भिती पसरली असून गावात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
महेश गायकवाड

सोलापूर - अचलेर गावामध्ये मध्ये शनिवारी झालेल्या दगडफेकीच्या व जाळपोळीच्या घटनेनंतर ११ आरोपींवर मुरूम पोलीस ठाण्यात विविध कलमाखाली गुन्हे दाखल करण्यात आले असून गावात तरुण मुलांनी तलवारी व इतर घातक शस्त्रे घेऊन धिंगाणा घालत दहशत निर्माण केल्यामुळे गावातील नागरिक भयभीत झाले असून गावात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

लोहारा तालुक्यातील अचलेर ग्रामपंचायतीमधील १४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या निधीतील लाखो रुपयांच्या कथित गैरव्यवहाराबाबत प्रदीप पांडुरंग पुजारी यांनी दिलेल्या पूर्वीच्या निवेदनावर तात्काळ कारवाई करण्यात यावी. येत्या १५ दिवसांत कार्यवाही न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा पुजारी यांनी जिलाधिकाऱ्यांना एका निवेदनाद्वारे दि. १ सप्टेंबर रोजी दिला आहे. दरम्यान अचलेर ग्राम पंचायत मध्ये झालेल्या घोटाळ्याची तक्रार का दिली म्हणून सत्ताधारी गटातील तरुण मुलांनी गावात शस्त्रे घेऊन फिरत दहशत निर्माण केली आहे.

लोहारा तालुक्यातील अचलेर ग्रामपंचायतीमधील १४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या निधीमधून झालेल्या कामात कथित गैरव्यवहाराबाबत प्रदीप पुजारी यांनी यापूर्वी संबंधित कार्यालयाकडे तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणामध्ये ग्रामसेवक व संबंधित अधिकाऱ्यांकडून झालेल्या कामांची, खर्चाची व उपलब्ध कागदपत्रांची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. तसेच दोषी आढळणाऱ्या संबंधित व्यक्तींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. पूर्वीच्या निवेदनामध्ये नमूद केलेल्या सर्व मुद्द्यांचा फेरतपास घेऊन संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यात यावी. असे म्हटले आहे

चौकशीमध्ये गैरप्रकार अथवा आर्थिक अनियमितता आढळल्यास संबंधित दोषींवर नियमानुसार कठोर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई येत्या १५ दिवसांत करण्यात यावी. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असून त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा थेट इशारा पुजारी यांनी दिला आहे.



**ग्रामपंचायत अचलेर येथे १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोग मधील निधी कोठे व कोणत्या पद्धतीने खर्च करण्यात आला याबाबत प्राप्त तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करून चौकशी अहवाल मागविण्यात आला होता.**

**यातील तक्रारदार प्रदीप पांडुरंग पुजारी यांच्या तक्रारीतील अहवालावर १० दिवसात लेखी म्हणणे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्याप म्हणणे सादर केलेले नाही तरी सदर पत्र प्राप्त होताच ग्रामपंचायतीचे लेखी म्हणणे तात्काळ सादर करावे. असे आदेश असताना आजतागायत कोणतीच कारवाई न झाल्यामुळे आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा काल जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.**

**– प्रदीप पुजारी**
**सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते,**
**अचलेर ता. लोहारा**

गेल्या,१५ दिवसांपूर्वी अचलेर येथे सरपंचांने ५०-६० जणांना घेऊन घरावर हल्ला व दगडफेक केल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते प्रदीप पुजारी यांनी केला आहे

अचलेर येथील १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोगाच्या निधीतील अपहार व भ्रष्टाचाराबाबतच्या तक्रारीवर दिनांक २०.०२.२०२६ रोजीच्या सुनावणीत तक्रारदाराने सादर केलेल्या लेखी म्हणणेवर अभिप्राय देणेबाबत संबंधितांना आदेश देण्यात आले होते.



वित्त आयोग निधीच्या कथित गैरव्यवहाराचीही चौकशीची मागणी! केल्यामुळे आपल्या घरावर शस्त्रे घेऊन हल्ला करण्यात आला आणि मोटारसायकली जमावाने जाळल्या आहेत असे तक्रारी मध्ये म्हटले असून आत्तापर्यंत ११ लोकांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

# माढा येथे आरोग्य सार्वजनिक सुरक्षा संदर्भातील विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी आमरण उपोषण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माढा शहरातील प्रभागातील नागरिकांच्या सार्वजनिक हिताच्या विविध समस्या प्रशासनाकडे मांडण्यात आल्या होत्या. मात्र या समस्याकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींनी यांनी साथ दुर्लक्ष केल्यामुळे शहरातील अश्फाक मोमीन हे आमरण उपोषण करिता बसले आहेत.

उपोषण करते अशपाक मोमीन यांनी विविध मागण्याचे अर्ज सादर करीत विविध समस्या प्रशासनाकडे दिल्या होत्या त्यापैकी माढा नगरपंचायत समिती नगर माढा वैराग रस्त्या लगेचच्या साईड पट्ट्या खुल्या करण्यात याव्यात.

# पनवेलमध्ये प्रसिद्ध 'पार्ले' कंपनीच्या नावाखाली व्यापाऱ्यांना मोठा गंडा; बनावट एजन्सीकडून किराणा दुकानदारांची हजारो रुपयांची फसवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/केतन भोज : प्रसिद्ध पार्ले कंपनी कडून बनावट फ्रिज स्कीम आणि डिस्प्ले ग्रीमेंट दाखवून पनवेल शहरातील किराणा व जनरल स्टोअर्स दुकानदारांना हजारो रुपयांचा चुना लावल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने बनावट कंपनी तयार करून बनावट जी.एस.टी. (GST) आणि पॅन कार्ड नंबरच्या आधारे व्यापाऱ्यांची आर्थिक फसवणूक केली आहे.

काय आहे नेमका प्रकार?

मिळालेल्या माहितीनुसार, 'सोनी एजन्सी' (Sony gency) नावाच्या बनावट कंपनीच्या नावाने कंपनीचे मालक मोहन गव्हाणे आणि त्याचे सेल्समन आरिफ अब्दुल्ला चलिल नावाच्या व्यक्तीने पनवेल शहरातील विविध भागांतील किराणा दुकानदारांशी संपर्क साधला. पार्ले कंपनीची उत्पादने आणि फ्रिज डिस्प्लेसाठी ठेवल्यास महिना ३,५०० रुपये किंवा इतर आकर्षक परतावा (स्कीम) मिळवून देण्याचे आमिष त्याने दुकानदारांना दाखवले.त्यासाठी त्याने दुकानदारांना 'Fridge Apply Display Agreement Paper' दाखवून

बनावट कागदपत्रे आणि बनावट जी.एस.टी.नंबरचा वापर केला.आरोपी आरिफ अब्दुल्ला चलिल याने या फसवणुकीसाठी बनावट पॅन कार्ड आणि जी.एस.टी. क्रमांकांचा वापर केला.पनवेल स्टेशन रोडवरील बनावट पत्त्याचा उल्लेख करून दुकानदारांचा विश्वास संपादन करण्यात आला.परंतु मुदत संपल्यानंतरही दुकानदारांना कोणताही मोबदला किंवा फ्रिज न मिळाल्याने ही कंपनी पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्ट झाले.

कठोर कारवाईची मागणी

या फसवणुकीमुळे पनवेलमधील अनेक लहान-मोठे किराणा व्यापारी धास्तावले आहेत.प्रसिद्ध ब्रँडच्या नावाखाली चालणाऱ्या या रॅकेटचा पर्दाफाश करून आरोपी आरिफ अब्दुल्ला चलिल आणि त्याच्या सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा व त्यांना तात्काळ अटक करून कडक कारवाई करावी,अशी जोरदार मागणी स्थानिक व्यापाऱ्यांनी पनवेल पोलिसांकडे केली आहे.

# वागदरी येथील जेष्ठ कार्यकर्ते तुळशीराम सुरवसे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के. गायकवाड : वागदरी ता.तुळजापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी व्यवस्थापक तुळशीराम भाऊ मारुती सुरवसे (पाटील) यांचे दि.१ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठिक ५.०० वा दरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

कै. तुळशीराम सुरवसे सेवानिवृत्ती नंतर गावात साजरे होणाऱ्या प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत असत.आपल्या बँकिंग क्षेत्रातील अनुभवामुळे दरवर्षी गावात होणाऱ्या पारायण सोहळ्याचा हिशोब चोख ठेवणारी प्रामाणि व्यक्ती म्हणून त्यानी गावचा विश्वास संपादन केला होता.

दि.०२ सप्टेंबर २०२६ रोगी सकाळी ठिक ११.०० वा. दरम्याने त्यांच्या पार्थिवावर वागदरी येथिल स्मशान भूमित अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन मुली, सुन, जावाई नातवंडे असा परिवार आहे.

त्यांच्या निधनाने शिव जन्मोत्सवानिमित्त आयोजित शिवसप्ताहामध्ये होणाऱ्या सर्वच उपक्रमांना पाठिंबा देवून तरुणांचे मनोबल उंचावणारे व्यक्तिमत्व आज काळाच्या पडद्याआड झाले अशा भावपूर्ण शब्दात त्यांना सर्व ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

# खामसवाडी येथील श्री सिद्धीविनायक मल्टीस्टेटच्या शाखेचा चौथा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



खामसवाडी/हनुमंत पाटुळे : श्री सिद्धिविनायक मल्टीस्टेट शाखेचा ४था वर्धापण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

तालुक्यातील खामसवाडी सह पंचक्रोशीतील ग्राहकांना अल्पावधीतच उत्तम आणि विश्वासार्ह आर्थिक सेवा देऊन नावारूपाला आलेल्या श्री सिद्धीविनायक मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी, धाराशिव ही अल्पावधीतच नावारुपाला येऊन शेतकरी व ग्राहक यांना उत्कृष्ट पध्दतीने कार्य करत असुन अतिशय उत्तम सेवा देत आहेत. वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत झाडे लावा, झाडे जगवा या संदेशासह जिल्हा परिषद प्रशाला, खामसवाडी येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. शाळेच्या आवारात वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्री सिद्धीविनायक परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी आवर्जून उपस्थित राहून शाखेला सदिच्छा भेट दिली व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेवर विश्वास ठेवून जोडले गेलेले सभासद, ठेवीदार, कर्जदार, खातेदार, हितचिंतक आणि ग्राहकांनी शाखेला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी श्री सिद्धीविनायक जिल्हा पतसंस्थेचे चेअरमन गणेश कामटे साहेब, उपाध्यक्ष व्यंकटेश कोरे साहेब, श्री सिद्धीविनायक मल्टीस्टेटचे सीईओ राजकुमार जाधव साहेब, अड सीईओ अरविंद गोरे साहेब, जिल्हा पतसंस्थेचे सीईओ रामचंद्र सारडे, एम डी देविदास कुलकर्णी, खामसवाडी शाखेचे शाखा व्यवस्थापक बलराम कुलकर्णी, अक्षय शेळके यांच्या सह संस्थेचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी वर्ग, सभासद आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखा व्यवस्थापक व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# उगाव विद्यालयाच्या मुलींची खो-खोमध्ये जिल्हापातळीवर गरुडझेप!

**१४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड; तर १९ वर्षे वयोगटात तालुक्यात तृतीय क्रमांक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगावच्या १४ वर्षे वयोगटातील मुलींनी खो-खो स्पर्धेत दमदार कामगिरी करत जिल्हापातळीवर गरुडझेप घेतली आहे. भाऊसाहेबनगर येथे झालेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत उगाव विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत १४ वर्षे वयोगटात विजेतेपद मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

तसेच १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघानेही उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्यात तृतीय क्रमांक मिळविला. निर्धारित वेळेत सामना बरोबरीत राहिल्यानंतर झालेल्या सडन डेथमध्ये अवघ्या २ सेकंदांच्या फरकाने उगावच्या संघाने विजय मिळविला. या कामगिरीमुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यशस्वी खेळाडूंमध्ये भक्ती पानगव्हाणे, श्रावणी जाधव, गायत्री जाधव, प्रांजल पारधे, कावेरी सोनवणे, श्रावणी गायकवाड, संस्कृती सोनवणे, अक्षरा पानगव्हाणे, रिदा शेख, दिव्या बर्डे, गायत्री बोंडवे, आलिया तांबोळी, अश्विनी पवार, शर्वरी पानगव्हाणे व अदिती आहेर यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल मार्गदर्शक क्रीडाशिक्षक भालचंद्र सूर्यवंशी व करीम तांबोळी यांचे विशेष कौतुक होत आहे. विजयी खेळाडू व मार्गदर्शकांचे विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर ढोमसे, उपाध्यक्ष साहेबराव पानगव्हाणे, सरचिटणीस माधवराव चव्हाण, महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य दीपकभाऊ जोंधळे, सचिव दत्ताभाऊ जोंधळे, सदस्य नंदकुमार पानगव्हाणे, विजयराव ढोमसे, नंदू मामा राठी, प्राचार्य . कैलास गवळी, पर्यवेक्षक नंदराम ढिकले तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**उपचारादरम्यान एकाचा मृत्यू एक गंभीर जखमी**

**अपघातानंतर छोटा हत्ती चालक घटनास्थळावरून पसार**

# टेलरनगर येथे मोटारसायकलला छोटा हत्तीची जोरदार धडक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : मौजे टेलरनगर, ता. तुळजापूर येथे मोटारसायकलला टाटा कंपनीच्या छोटा हत्ती वाहनाने समोरून जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात मोटार सायकल वरील मधुकर बळीराम यादव वय वर्ष ४५ आणि त्यांच्या पत्नी अश्विनी मधुकर यादव वय वर्ष ४० हे दोघे राहाणार पोहनेर ता जि धाराशिव हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान अश्विनी मधुकर यादव यांचा मृत्यू झाला असून मधुकर यादव यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल क्रमांक MH 25 F 6919 वरून मधुकर बळीराम यादव व त्यांच्या पत्नी अश्विनी यादव रा पोहनेर तालुका जिल्हा धाराशिव हे दोघे तुळजापूरकडून मंगरूळ मार्गे अक्कलकोटकडे जात होते. त्याचवेळी टाटा कंपनीचा छोटा हत्ती क्रमांक चक २५ ग २२८६ हा इटकळ मार्गे तुळजापूरकडे जात असताना टेलरनगर परिसरात दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली.




धडकेमुळे मोटारसायकलवरील दोघेही रस्त्यावर कोसळले. त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. जखमींना तातडीने उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे हलविण्यात आलेत्यानंतर त्यांना अश्विनी हॉस्पिटल सोलापूर येथे दाखल करण्यात आले मात्र उपचारादरम्यान अश्विनी मधुकर यादव वय ४० वर्ष यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, अपघातानंतर छोटा हत्तीचा चालक युनूस वस्ताद, रा. गुजनूर, ता. तुळजापूर, याने जखमींना मदत करण्याऐवजी घटनास्थळावरून पळ काढल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेनंतर फिर्यादी सुदर्शन बळीराम यादव, वय ४६ वर्षे, यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तेव्हा इरफान कचरू पठाण (रा. काटगाव), बाळासाहेब गायकवाड (रा. येवती), एकनाथ भीमराव चव्हाण (रा. चुंगी) आणि जावेद मुजावर (रा. काटगाव) यांच्याकडून घटनेबाबत माहिती घेतली. छोटा हत्तीने मोटार सायकलला समोरून जोरदार धडक दिल्यानंतर चालक घटना स्थळावरून निघून गेल्याची माहिती मिळाली असून याप्रकरणी फिर्यादी सुदर्शन बळीराम यादव यांच्या फिर्यादी नुसार चालका विरुद्ध तक्रार नोंद करण्यात आली असून पोलीसांकडून पुढील तपास चालू आहे